# दांडेकर पूल परिसरातील सदनिकांचे आज हस्तांतरण

## नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांची उपस्थिती

**प्रतिनिधी, पुणे**

**गेल्या दोन** दशकांपासून परवडणाऱ्या घरांच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नाईकनवरे डेव्हलपर्सतर्फे झोपडपट्टी पुनर्वसनअंतर्गत दांडेकर पूल परिसरात विकसित केलेल्या १९२ सदनिकांचे शनिवारी (१ जून) राज्याच्या नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांच्या हस्ते हस्तांतरण होणार आहे.

दांडेकर पूल परिसरात ७.४१ एकरमध्ये दोन झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हाती घेतले आहेत. यातील परिवर्तन या प्रकल्पातील १९२ सदनिका सकाळी साडेअकरा वाजता होणाऱ्या कार्यक्रमात झोपडपट्टीधारकांना हस्तांतरित करण्यात येणार आहेत. त्याबरोबरच सात दुकानांचेही हस्तांतरण करण्यात येणार आहे, अशी माहिती नाईकनवरे डेव्हलपर्सचे संचालक हेमंत नाईकनवरे आणि रणजित नाईकनवरे यांनी शुक्रवारी दिली. दांडेकर पूल परिसराबरोबरच सातारा रस्ता, मंगळवार पेठ (जुना बाजार), रामटेकडी, विद्यापीठ रस्ता या ठिकाणी हे प्रकल्प उभारण्यात येत आहेत. दांडेकर पुलाजवळ 'परिवर्तन'सह आणखी एक प्रकल्प उभारला जात असून या दोन प्रकल्पांमध्ये एकूण सहा इमारती बांधल्या जात आहेत.